आदर्श गांव आमचा गांव

पाचघर

ग्राम पंचायत ओगदा, ता.वाडा, जि.पालघर.






यशोगाथा

विकासाच्या वाटेवर पाचघर गांव

तालुका वाडा, जिल्हा पालघर.

वाडे तालुक्यातील पाचघर गावामध्ये दिनांक 17/12/2010 रोजी पंचायत समिती वाडाचे कृषीअधिकारी तथा (संपूर्ण स्वच्छता अभियान कार्यक्रम अधिकारी) श्री एस.टी.पाटील सर आणि (संपूर्ण स्वच्छता अभियान मास्टर ट्रेनर) श्री ए.जी.काठोळे गुरूजी यांनी गावाला भेट दिली.संपूर्ण स्वच्छता अभियान (निर्मल भारत अभियान)संदर्भात माहिती देण्यासाठी गावकऱ्यांची सभा घेतली. सभेमध्ये ग्रामस्थांची शासन आणि प्रशासना बद्दलची नाराजी दिसून आली. परंतू गावकऱ्यांमध्ये एकी व कष्टकरण्याची जिद्द हा आशेचा किरण दिसून आला. याच आशेचा आधार घेत आम्ही कामाला सुरूवात केली.

पूर्वस्थिती :- ग्रामस्थांच्या माहिती नुसार वनखात्याने वनाच्या संरक्षणसाठी पाच कुटूंबांना या गावात आणून ही वस्ती वसविली.तेव्हापासून या गावाला 'पाचघर' हे नाव पडले.आज या गावात 80 कुटूंबे वास्तव्स करतात.संपूर्ण स्वच्छता अभियान कार्यक्रमापूर्वी गावामध्ये इतर गावंाप्रमाणे ठिकठिकाणी घाण,कचरा अस्ताव्यस्त पसरलेला होता.अनुसुचीत जमातीच्या 80 कुटूंबांच्या गावात स्वच्छतागृहे हाताच्या बोटावर मोजण्या इतकीच होती.सांडपाणी साठलेले होते.एकंदरीत गावाची स्थिती आजार रोगांना आमंत्रण देणारी होती. त्यात ग्रामस्थांचा दोष नव्हता. त्यांना स्वच्छते संबंधी मार्गदर्शन केलेले नव्हते.श्री एस.टी.पाटील सर,श्री ए.जी.काठोळे गुरूजी,आणि ग्रामसेवक श्री केशव शेवटे यांनी "संपूर्ण स्वच्छता अभियान (निर्मल भारत अभियान)"या कार्यक्रमाचे औचित्य साधून ग्रामस्थांच्या आणि गावातील श्री मोतीराम किसन खोरगडे गुरूजी यांच्या सहकार्याने 17 डिसेंबर 2010 पासून "पाचघर गावाचा संपूर्ण विकास "करण्याचा संकल्प केला.

**आमच्या कडून आपले नेहमी असेच स्वागत केले जाते.**

मा.श्री शेखरजी गायकवाड साहेब.(मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प.ठाणे)



**मा. श्री डॉ.विजय सुर्यवंशी (मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प.पालघर)**



मा.श्री शेखरजी गायकवाड साहेब.(मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प.ठाणे) :- पाचघर वाशियांना मोलाचे मार्गदर्शन करत असतांना आणि पुढील विकासाबाबत मार्गदर्शन करतांना.



मा.श्री रविंद्र पाटील साहेब.(अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प.ठाणे) :-उपस्थितांना मार्गदर्शन करतांना आणि ग्रामस्थांचे कौतुक करतांना.



**मा.ना.श्री विष्णूजी सवरा साहेब (आदिवासी विकास मंत्री ) :- पाचघर गावाची पहाणी करतांना.**



मा.ना.श्री विष्णूजी सवरा साहेब (आदिवासी विकास मंत्री ) :- पाचघर गावाच्या विद्यूत सुविवधाचे उद्गाठण करतांना.



मा.ना.श्री विष्णूजी सवरा साहेब (आदिवासी विकास मंत्री ) :- पाचघर गावाचे ग्रामस्थ व उपस्थितांना मार्गदर्शन करतांना.



**मा.श्री रविंद्र शिंदे साहेब (अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प.ठाणे)** :-पाचघरच्या ग्रामस्थांना मार्गदर्शन करतांना गावाच्या विकास कामाबाबत माहिती सांगतांना.



**मा. श्री डॉ.विजय सुर्यवंशी (मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प.पालघर)** :-पाचघरच्या ग्रामस्थांना मार्गदर्शन करतांना गावाच्या उन्नती विवषयी माहिती सांगतांना.



**मा.श्री राहूल धूम साहेब (गटविकास अधिकारी पंचायत समिती वाडा):- आमचे मार्गदर्शक आणि प्रेरणास्थान.नेहमीच पालकाच्या भुमिकेत पाठिशी उभे राहायचे.**



**मा.श्री सुभाष घाडगे साहेब** (कृषि विकास अधिकारी जि.प.ठाणे) मा.अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी यांच्या सोबत.



**मा.ना.श्री विष्णूजी सवरा साहेब (आदिवासी विकास मंत्री ) :- पाचघर गावाची पहाणी करतांना.**



मा. श्री डॉ.विजय सुर्यवंशी (मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प.पालघर) :-पाचघर गावात करावयाच्या विकास कामासाठी गावाची पहाणी करतांना.



मा.श्री उदय चौधरी साहेब.(मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प.ठाणे):- पाचघर गावाची पहाणी करतांना



सन 2016 / 17 मधील वनराई बंधारा पाचघर मधील ग्रामस्थांनी श्रमदानातून बांधलेला वनराई बंधारा.



संपूर्ण स्वच्छता : संपूर्ण स्वच्छता म्हणजे 100 % कुटूंबाकडे शौचालय बांधून त्याचा सर्वांनी वापर करणे.सांडपाण्याचे 'परसबाग व शोषखड्ड्यात व्यवस्थापन' करणे आणि घनकचऱ्याचे जैविक व अजैविक कचऱ्यात विभागणी करून कंपोस्ट खत व शोभेच्या वस्तू बणवण्या संबंधी मार्गदर्शन श्री एस.टी.पाटील सर यांनी ग्रामस्थांना केल. तसेच कृषिविभागाच्या योजनांची माहिती सांगितली.ग्रामस्थांच्या मानसिकतेत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला.

पाचघर ग्रामस्थांना देशाच्या पटलावर आणणारे आणि आदर्श गावाची संकल्पना प्रत्यक्षात उतरवणारे मा.श्री एस.टी.पाटील साहेब (कृषि अधिकारी पं.स.वाडा तथा कार्यक्रम अधिकारी संपूर्ण स्वच्छता अभियान) यांनी श्री काठोळे गुरूजी आणि श्री केशव शेवटे (ग्रामसेवक) यांना सोबत घेवून ग्रामस्थांना रात्रीच्या वेळी मार्गदर्शन करतांना.



कृषीअधिकारी श्री एस.टी.पाटील यांच्या मागणीला साथ देवून वाडे तालुक्यातील सर्व कृषी सेवा केंद्राच्या मालकांनी वारंवार बियाणे पुरवून सांडपाण्यावर परसबागा लावण्यात आल्या.

घनकचरा व्यवस्थापनेसाठी वाडे तालुक्यातील कुडूस येथील "किरण अॅग्रो सेंटर कुडूस व श्री कृषी सेवा केंद्र कुडूस"यांनी 80 कुटूंबांना प्रत्येकी दोन प्लास्टिक कचरा पेट्या पुरविल्या त्यामुळे कचऱ्याची जैविक व अजैविक अशी विभागणी घरापासूनच झाली.

संपूर्ण स्वच्छता अभियान अंतर्गत गवंडी प्रशिक्षण घेवून गावातील तरूणांना कमी खर्चाचा, 'शोषखड्डयाचा सोपा संडास' बांधण्याचे प्रशिक्षण दिले.गावकऱ्यांनी लगेच खड्डे खोदून 900 /- ते 1200/- रूपयात शौचालय बांधून त्याला कारवीच्या कुडांच्या भिंती घालून शौचालये पूर्ण केली.

श्री काठोळे गुरूजी (मास्टर ट्रेनर संपूर्ण स्वच्छता अभियान) :- शोषखड्ड्याचा सोपा संडास बांधून दाखवतांना



**श्री किरण गोपाळ पाटील. (किरण अॅग्रो सेंटर कुडूस) :- पाचघर ग्रामस्थांना प्लास्टिक कचरा पेटी पुरवणारे किरण अॅग्रो सेंटर मालक श्री किरण गोपाळ पाटील यांचे स्वागत श्री किशोर मोतीराम खोरगडे करत आहेत.**



**(अजैविक कचरा )कागदापास्ून श्री किशोर खोरगडे यांनी बणवलेल्या आकर्षक वस्तू**



ग्रामस्थांच्या एकत्र येण्याने व सकारात्मक दृष्टीकोनामुळे गावात वेगवेगळ्या योजना यशस्वीपणे राबू लागल्या. त्याच बरोबरीने गावातून श्रमदानाची कामे होवू लागली.गावकऱ्यांना एकत्र ठेवण्याचे मोलाचे कार्य गावातील श्री मोतीराम खारेगडे,श्री किशोर खोरगडे,श्री भिमराव खोरगडे, श्री सोमनाथ कोदे,श्री मोहन लोखंडे आणि गावातील इतरांनी केले. गावात दारू बंदी,गुटका बंदी आहे. शुक्रवार हा सार्वजनिक स्वच्छतेचा दिवस ठरवलेला आहे.या दिवशी सार्वजनिक स्वच्छतेची कामे केली जातात.गावसभा घेतली जाते.ग्रामस्थ दर वर्षी श्रमदानातून वनराई बंधारे,वृक्षारोपन,रस्तादुरूस्तीची कामे करतात.

श्री मोतीराम किसन खोरगडे (गुरूजी ) :- ग्रामस्थांना वेळोवेळी एकत्र ठेवण्याचे मोलाचे कार्य केले. वेळ प्रसंगी मार्गदर्शन करून ,ग्रामस्थांच्या अडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न केले.



गावामध्ये वीज नाही.सौर ऊर्जेवर चालणारे सौर दिव्यांचा वापर करतात.आजही सौर ऊर्जेच्याच दिव्यांचा वापर केला जातो.ग्रामस्थांच्या स्वच्छ राहणीमानाचा मोह इतरांना होवू लागला .त्यामुळे अनेक सामाजिक काम करणाऱ्या संस्था पाचघर गावाच्या पे्रमात पडल्या आणि आमचे भाग्य उजळले.



ग्रामपंचाय विभाग :- ग्राम पंचायत विभागाकडून (रूपये 17,12,500 /- चे 25 'इंदिरा आवास घरकूल' योजना),(39,000 /- रूपयांचे वनराई बंधारे),(3,15,00 /- रूपयांचे 3 सिंचन विहीरी), (78,155 /- रूपयांचे रोपवाटिका), (2,12,347 /- चे 500 वृक्ष लागवड) इत्यादी "महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेची " कामे झाली.तसेच टेरी संस्थेच्या मदतीने 80 सौर कंदील पुरविले.

इंदिरा आवास घरकूल योजनेतील घरकुलांची पहाणी करतांना मा. श्री रविंद्र शिंदे साहेब (अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प.ठाणे ) व श्री सुभाष घाडगे साहेब



इंदिरा आवास योजनेतील घरकूल .



सिंचन विहीर :-




कृषी विभाग : कृषी विभाग अंतर्गत 10 लाभार्थ्यांची निवड करून रूपये 5,00,000 /- चे कृषी निविष्ठा, सु.औजारे, पिक संरक्षण औजारे, इंजीन, पाईप इत्यादींचा 100 % अनुदानाने पुरवठा केला आणि पुरूष बचत गटास 30,000/- रूपयांचे 100% अनुदानातून सुधारीत औजारे,स्प्रेपंप,इंजीन,ताडपत्री,पाईप इत्यादी साहित्यांचा पुरवठा केला.

टेरी संस्था व जिल्हा परिषद ठाणे यांच्या मार्फत पुरविलेले 80सौर कंदील 2 चार्जिंग युनिट. सदर सौर कंदील लाभार्थी दर महा 30 /- रूपये देवून चार्ज करून घेत आहेत.

टेरी संस्था व जिल्हा परिषद ठाणे यांच्या कडून पुरवलेले सौर कंदील :-



सौर कंदील युनीट पाहण्यासाठी आलेल्या श्रीम.वेरेना हैंझेल मॅडम (जर्मनी),श्रीम स्वाती टोमर मॅडम (टेरी संस्था बेलापूर मुंबई ).



स्वर्ण जयंती ग्राम रोजगार :- अंतर्गत बचत गटास रूपये 1,25,000 /- च्या (100 शेळ्या) कर्जाचे वाटप करण्यात आले आणि 10,000/- रूपये फिरता निधी देण्यात आला.

समाज कल्याण विभाग :- अंतर्गत रूपये 2,200 /- ची एका शिलाई मशीनचा लाभ देण्यात आला.

पाणी पुरवठा विभाग :-अंतर्गत 13 व्या वित्त आयोगामधून रूपये 2,00,000 /- खर्चाचे मोहमाळ (पाचघर) येथील विहीचे खोलीकरण आणि ताडमाळ (पाचघर) येथे बोडकी विहीरीचे बांधकाम केले.

मोहमाळ येथील खोलीकरण केलेली विहीर



पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद ठाणे :- अंतर्गत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम सन 2012 / 2013 मध्ये रूपये 14,00,000 /- खर्चून सौर ऊर्जेवरील नळ पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्यात आली.






लघ्ू पाट बंधारे :- अंतर्गत रूपये 10,00,000 /- खर्चाचा सिमेंटचा पक्का बंधारा बांधण्यात आला.

तालुका कृषी विभाग :- अंतर्गत भजनी साहित्य वाटप, भाजीपाला बीयाणे, सतरंज्या व खुर्च्या , 3 सौर दिवे देण्यात आले. 5.5 हेक्टर जमीनीवर आंबा लागवड करण्यास मदत केली.दोन शेतकऱ्यांना मजगीचे काम दिले.

श्रमदानातून वनराई बंधारा बांधणारेश्री काठोळे (गुरूजी)सह पाचघर ग्रामस्थ :-



आर.सी.एफ.कंपणी :- 53 शेतकऱ्यांची आलिबाग येथे सहल व कृषी विषयक प्रशिक्षण दिले. 50,000 /- रूपये खर्चाचा वनराई बंधारा आणि सार्वजनिक कार्यक्रमात जेवणासाठी भांड्यांचा संच देण्यात आला. 8,500 /- रूपयांचे मोगरा फूल झाड व फळ झाडे यांचे वाटप करण्यात आले. मधुमक्क्षी पालन 12 शेतकरी बचत गटास 1,60,000 /- रूपयांची मदत करण्यात आली.

मधुमक्क्षी पालन योजना चेकचे वाटप :- मधुमक्क्षी पालन रकमेच्या चेकचे वाटप करतांना मा.श्री अनावकर साहेब,(आर.सी.एफ) कोकण विभाग इन्चार्ज, मा. श्री उदय झा साहेब यांच्या सोबत



आर.सी. एफ.कंपणी  कडून जेवणासाठी भांडी पुरवण्यात आली.



रोटरी क्लब ऑफ चेंबूर (मुंबई) :- यांनी पाचघर गाव दत्तक घेवून आरोग्य तपासणी शिबीर घेतला. सार्वजनिक सभामंडपास आणि सर्व स्वच्छतागृहासाठी 65,000 /-रूपयांचे सिमेंटचे पत्रे पुरविले. विद्‌यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व 5 सायकली पुरविल्या.सौर ऊर्जा पाणी योजनेची 65,000 /- रूपये लोकवर्गणी भरण्यात आली. 100 मुलींसाठी जर्मन गोवर (रुबेला) लसीकरणासाठी 6000 /-रूपये इंपॅक्ट इंडिया फाउंडेशनकड भरण्यात आले . पिठाच्या चक्कीसाठी 20,000 /-  रूपये बिनव्याजी कर्ज देण्यात आले. गावातील 3 महिला व 1 पुरूष यांना कोल्हापूर येथे नेवून पापड बणविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.पापड बणवण्यासाठी लागणारे 8मशीण देण्यात आले.गावातील महिलांना .शिलाईकामाचे प्रशिक्षण देवून 5 शिलाई मशीणचे वाटप करण्यात आले

रोटरी क्लब ऑफ चेंबूर यांच्या कडून आरोग्य तपासणी :-



**आरोग्य तपासणीत सहभागी झालेल्या डॉ.पाटील मॅडम व त्यांच्या सहकारी (प्राथ.आरोग्य केद्र परळी )ता.वाडा,जि.ठाणे**



**आरोग्य तपासणीत सहभागी झलेले डॉ. तपशाळकर व त्याचे सहकारी (इम्पॅक्ट इंडिया फाउंडेशन शाखा वाडा )**



**पिठाची चक्की :-श्रीम लता नायडू रोटरी गव्हर्नर रोटरी व रोटरी क्लबचे सर्व अधिकारी**




**सायकलीचे वाटप करतांना रोटरी क्लब चेंबूरचे अध्यक्ष श्री उदय झा साहेब व सदस्य श्री व्ही. डी. पाटील साहेब.**



**रोटरी क्लब ऑफ चेंबूरने सभा मंडपासाठी पुरविलेल्या सिमेंटच्या पत्र्याचा शेड आणि गावकऱ्या सोबत रोटरी क्लब ऑफ चेंबूरचे सदस्य श्री अमृत एस. पाटील .**



पापड उद्योग :-




**वन विभाग (वन्य जीव):- अंतर्गत 30 कुटूंबांना गॅस सिलेंडरसह वाटप करण्यात आले.किराणा दुकानासाठी बचत गटास कर्ज वाटप करण्यात आले.वैरण विकास कार्यक्रम, 1 रोपवाटीका, विहीर दुरूस्ती करण्यात आली. सिमेंट बंधारा दुरूस्त करण्यात आला.3 शिलाई मशीन वाटप करण्यात आल्या.**

सार्वजनिक बांधकाम विभाग :- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत मुख्यरस्ता ते पाचघर गावापर्यंत 6 कि.मी.रस्त्याचे माती भराव काम करण्यात आले.

आदिवासी विकास प्रकल्प जव्हार :- ठक्कर बाप्पा अंतर्गत 9,00,000 /- रूपये खर्चाचा रस्ता. आणि आमदार फंडातून 1 कि.मी. रस्त्याचे खडीकरण मंजूर आहे.

पाचघर गावच्या विकासाचे कार्य करणारे ग्रामसेवक श्री केशव शेवटे मा. मुख्यकार्यकारी अधिकारी यांच्या कडून अभिनंदन स्विकारतांना.




श्री एस.टी.पाटील यांचा रोटरी क्लब कडून सत्कार



गुरांच्या नत्राचे योग्य व्यवस्थापन करून आम्ही गाव स्वच्छ ठेवतो.



पाचघर गावाच्या विकासावर विचारविनिमय :-



पाचघर गावाच्या सर्वांगीन विकास कार्यक्रमात केलेल्या सहकार्या बद्दल आम्ही ग्रामस्थ आपल्या सर्वांचे आभारी आहोत .

**धन्यवाद !**